दिनांक :– ०२.०८.२०२१

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक १)आशिषकुमार बापुराव बिरादार, वय ४३ वर्षे, व्यवसाय नौकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय, सोनपेठ जि. परभणी २)स. ईसा स. रहिम, वय ३० वर्षे, व्यवसाय कंत्राटी संगणक ऑपरेटर, तहसिल कार्यालय, सोनपेठ रा. कासार गल्ली, सोनपेठ जि. परभणी यांचे विरूध्द ५५,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून ती संगणक ऑपरेटर यांचेहस्ते स्विकारल्या प्रकरणी गुन्हा दाखल व अटक.**

---

दि.३०.०७.२०२१ रोजी यातील तक्रारदार यांनी पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नांदेड येथे तक्रार दिली होती की, तहसिल कार्यालय, सोनपेठ जि. परभणी येथील आलोसे तहसिलदार आशिषकुमार बापुराव बिरादार, वय ४३ वर्षे, व्यवसाय नौकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय, सोनपेठ जि. परभणी हे तक्रारदार यांना रेतीची ट्रक ने वाहतुक करण्यासाठी व वाहतुक करीत असतांना कोणतीही कार्यवाही न करण्यासाठी मासिक हप्ता म्हणुन ५५,०००/–रू. लाचेची मागणी करीत आहे. वगैरे मजकुराची तक्रार दिली होती. त्यावरून अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी दोन शासकिय पंच बोलावुन पंचा समक्ष तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यांत आली. दि.३०.०७.२०२१ रोजी करण्यांत आलेल्या पडताळणी मध्ये यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे ५५,०००/–रू. लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली त्यावरून दि.०२.०८.२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे तहसिलदार आशिषकुमार बापुराव बिरादार, वय ४३ वर्षे, व्यवसाय नौकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय, सोनपेठ जि. परभणी यांनी सदर लाचेची रक्कम ५५,०००/–रू. तहसिल कार्यालय येथील संगणक ऑपरेटर स. ईसा स. रहिम, वय ३० वर्षे, व्यवसाय कंत्राटी संगणक ऑपरेटर, तहसिल कार्यालय, सोनपेठ रा. कासार गल्ली, सोनपेठ जि. परभणी यांचे मार्फतीने स्विकारली आहे.

त्यावरून आलोसे १) आशिषकुमार बापुराव बिरादार, वय ४३ वर्षे, व्यवसाय नौकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय, सोनपेठ जि. परभणी, २) स. ईसा स. रहिम, वय ३० वर्षे, व्यवसाय कंत्राटी संगणक ऑपरेटर, तहसिल कार्यालय, सोनपेठ रा. कासार गल्ली, सोनपेठ जि. परभणी यांचे विरूध्द पोलीस स्टेशन सोनपेठ, परभणी येथे कलम ७, १२ भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आलोसे १) बिरादार व २) स. ईसा स. रहिम यांना अटक करण्यांत आली आहे.

ही कामगिरी श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, यांचे मार्गदर्शना खाली हिंगोली युनिट येथील श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली श्री भरत हुंबे, पोलीस उपअधीक्षक, परभणी पोह/विजय उपरे, पोना/महारूद्र कबाडे, पोना/ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना/ अविनाश किर्तणकार, चापोना/हिम्मतराव सरनाईक ला.प्र.वि. हिंगोली तसेच पोना/अनिल कटारे, पोशि/माणिक चट्टे, पोशि/मुक्तार ला.प्र.वि. परभणी यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री हुंबे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि. परभणी हे करीत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी/हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.१०६४,**

**दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५, /०२४५२–२२०५९७**

**श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली ९८२२२००९५९**

**श्री भरत हुंबे, पोलीस उपअधीक्षक, परभणी ७०२१००२११०**